# भारतीय महाविद्यालय, अमरावती

# राष्ट्रीय सेवा योजना

**(2014-15)**

प्रा. निलेश कडू
कार्यक्रम अधिकारी
प्रा. आम्रपाली वासनिक
महिला कार्यक्रम अधिकारी

---

# विशेष शिबीर अहवाल

सत्र 2014-15 चे विशेष शिबीर दत्तक ग्राम निभोरा, ता. भातकुली येथे 02 जानेवारी 2015 ते 09 जानेवारी 2015 या कालावधीत “स्वच्छ परिसर, सुंदर परिसर” या संकल्पनेतून संपन्न झाले. शिबीरामध्ये एकूण 100 विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या पथकाव्दारे ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. ग्राम स्वच्छता, व्यसनमुक्ती, समाज प्रबोधन किर्तन, अंधश्रध्दा निर्मुलन, पर्यावरण जनजागृती, स्त्रीभृण हत्या जनजागृती, शेतकरी आत्महत्या, दिंडी, प्रभात फेरी, पथनाट्य, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, गितगायन स्पर्धा, सांस्कृतीक कार्यक्रम, बंधारा व शेततळे निर्मिती इ. उपक्रम शिबीरादरम्यान राबविण्यात आले. या सर्व उपक्रमामध्ये गावंकरी मंडळीचा मोलाचा सहभाग लाभला व समारोपीय कार्यक्रमामध्ये स्पर्धेतील सहभागी गावातील विद्यार्थांना प्रोत्साहनपर बक्षिस वितरीत केले.

विशेष शिबीराचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

❖ 02 जानेवारी 2015 (शुक्रवार):

- दत्तक ग्राम निंभोरा येथे सकाळी 10.30 वा. आगमन.
- परिसर स्वच्छता, गावात येणा-या मुख्य रस्त्याची स्वच्छता व सजावट.
- दुपारी, अमोल तानबैस (माजी रा. से. यो. स्वयंसेवक) यांचे रा. से. यो. स्वयंसेवकांना मार्गदर्शन.
- शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदानाचे नियोजन व पाहणी.
- गावातील पोलीस पाटील व गावकरी मंडळीशी चर्चा.

❖ 03 जानेवारी 2015 (शनिवार):

- सकाळी प्रभात फेरी काढून शिबीराच्या उद् घाटन समारंभाची तयारी.
- शिबीराचे उद् घाटन सकाळी 10 वाजता झाले.
  - उद् घाटक : मा.डॉ.अरविंद देशमुख(समन्वयक,रा.से.यो.,सं.गा.बा.अम.विद्या.)
  - अध्यक्ष : मा. डॉ. आराधना वैद्य (सरचिटणीस, भारतीय विद्यामंदिर, अम.)
  - प्रमुख उपस्थिती : मा. डॉ. ए. जे. गादेवार (प्राचार्य, भारतीय महाविद्यालय, अम.)
    मा. डॉ. सुभाष गवई (सल्लागार समिती सदस्य, रा. से. यो.)
- दुपारी स्वयंसेवकांचे गृप करुन गावातील प्रत्येक घरी जाऊन 'कौटूंबिक माहिती सर्वेक्षण' केले.
- संध्याकाळी प्रार्थना व रा. से. यो. गीत.
- रात्री सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये 'समाज प्रबोधन किर्तन' आयोजित केले.
  - किर्तनकार : प. पु. प्रकाशमुनी मराठे (प्रा. पद्माकर बोदडे)
  - अध्यक्ष : प. पु. ज्ञानोबा बिडकर (प्रा. डि. एन. यादगीरे)

❖ 04 जानेवारी 2015 (रविवार):

- सकाळी प्रार्थना, योगासन व प्रभात फेरीच्या माध्यमातून घोषणा देऊन व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा, पर्यावरण, स्त्रीभृण हत्या जनजागृती केली.
- स्वयंसेवकांनी शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदान केले.
- दुपारी बौध्दिक सत्र
  - विषय : संभाषण कौशल्य, व्यक्तिमत्व विकास
  - वक्ते : प्रा. शितलबाबू तायडे (रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर)

  व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी, आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी संभाषण कौशल्य कसे फायदेशीर ठरते व संभाषण कौशल्य कश्या पध्दतीचे असायला पाहिजे हे आपल्या वकृत्व शैलीत दैनंदिन जिवनातील उदाहरणे देऊन स्पष्ट केले.
- संध्याकाळी प्रार्थना व रा. से. यो. गीत.
- रात्री सांस्कृतिक कार्यक्रमात पथनाट्यातून स्त्रीभृण हत्या जनजागृती, व्यसनमुक्ती जनजागृती व स्वच्छता जनजागृती केली.

❖ 05 जानेवारी 2015 (सोमवार):

- सकाळी प्रार्थना व योगासन.
- स्वयंसेवकांनी गावातील तरुणांसोबत गाळाने तुडूंब भरलेल्या सांडपाण्याच्या नाल्या स्वच्छ केल्या त्याचबरोबर शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदान केले.
- दुपारी बौध्दिक सत्र
    - विषय : मानव संसाधन
    - वक्ते : डॉ. सौ. एस. एस. कुळकर्णी (भारतीय महाविद्यालय, अमरावती)

    मानव संसाधनाचा एक भाग म्हणजे व्यवसाय प्रबंधन, यामधून विद्यार्थांना व्यवसायाच्या विविध संधी कश्या उपलब्ध होतील व आपल्या शिक्षणाचा आजच्या सामाजिक परिस्थितीवर मात करुन व्यवसायात कसे उतरावे यावर मोलाचे मार्गदर्शन केले.
- संध्याकाळी प्रार्थना व रा. से. यो. गीत.
- रात्री सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये 'राष्ट्रीय किर्तन' आयोजित केले.
    - किर्तनकार : सौ. पौर्णिमाताई सवई (जिजामाता कृषीभूषण)
    - अध्यक्ष : श्री. अनंतराव सोमवंशी(उपाध्यक्ष,भारतीय विद्यामंदिर,अम.)

❖ 06 जानेवारी 2015 (मंगळवार):

- सकाळी प्रार्थना व योगासन.
- स्वयंसेवकांनी गावातील प्रत्येक घराबाहेरील सांडपाण्याचे सोचखड्डे साफ करुन व आजुबाजूचे गवत काढून घरासमोरील परिसर स्वच्छ केला व शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदान केले.
- दुपारी बौध्दिक सत्र
    - विषय : विदर्भातील युवक आणि स्पर्धा परीक्षा
    - वक्ते : डॉ. श्यामसुंदर सोमवंशी (म.ज्योतिबा फुले महाविद्यालय, भातकुली)

    विदर्भातील युवक स्पर्धा परीक्षेमध्ये मागे का? त्याची कारणे यावर मार्गदर्शन करुन स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी होण्याच्या टिप्स दिल्या. आज स्पर्धा ही काळाची गरज आहे. सातत्य कसे टिकवावे आणि हेच यशाचे गमक आहे असे संबोधीत केले.
- संध्याकाळी प्रार्थना व रा. से. यो. गीत.

- रात्री सांस्कृतिक कार्यक्रमात पथनाट्यातून शेतकरी आत्महत्या व पर्यावरण जनजागृती केली व गावातील लहान मुलांसाठी गीतगायन स्पर्धाचे आयोजन केले.

❖ 07 जानेवारी 2015 (बुधवार):

- सकाळी प्रार्थना, योगासन व गावातील महिलांसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन.
- स्वयंसेवकांनी गावातील तरुण मुलांच्या सहकार्याने रस्त्याच्या आजुबाजूचे गवत काढून सर्व रस्ते झाडूने झाडून स्वच्छ केले. शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदान केले.
- दुपारी बौध्दिक सत्र
    - विषय : राष्ट्रीय सेवा योजना व आजचा तरुण
    - वक्ते : श्री. श्रीकृष्ण पखाले
    - अध्यक्ष : प्रा. बबीता येवले (क्षेत्रीय समन्वयक,रा.से.यो.,सं.गा.बा.अम.विद्या.)

    राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व, आजच्या तरुणांच्या समस्या व उपाय इत्यादी सबंधी मार्गदर्शन केले. विद्यार्थी कसा असावा त्याची कर्तव्य कोणती हे ग्रामगीतेच्या माध्यमातून पटवून दिले. संत गाडगे बाबा व संत तुकडोजी महाराज यांचे विचारही यावेळी मांडले.
- संध्याकाळी प्रार्थना, रा. से. यो. गीत व त्यानंतर गावातील लहान मुलांसाठी चित्र रंगभरण स्पर्धाचे आयोजन.
- रात्री सांस्कृतिक कार्यक्रमात पथनाट्य व गावातील पुरुष व महिलांसाठी भक्तीगीत व भजन गायन स्पर्धाचे आयोजन केले.

❖ 08 जानेवारी 2015 (गुरुवार):

- सकाळी प्रार्थना व योगासन.
- स्वयंसेवकांनी शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदान केले.
- दुपारी बौध्दिक सत्र
    - विषय : रा. से. यो. जीवनमुल्य रुजविणारी संस्कार पाठशाला
    - वक्ते : डॉ. अंबादास घुले (जिल्हा समन्वयक,रा.से.यो.,सं.गा.बा.अम.विद्या.)

  राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी दशेत मिळणारे मुल्य व संस्कार याची सांग़ड आपल्या वकृत्व शैलीतून स्पष्ट केले.

- संध्याकाळी प्रार्थना व रा. से. यो. गीत.
- रात्री सांस्कृतिक कार्यक्रमात गावातील महिला भजन मंडळीने टाळ व मृदुंगाच्या सह्याने वेगवेगळी भजने सादर केली.

❖ 09 जानेवारी 2015 (शुक्रवार):

- सकाळी प्रार्थना, योगासन व दिंडी काढून स्वच्छता व पर्यावरण जनजागृतीच्या घोषणा दिल्या, यामध्ये स्वयंसेवकांनी विविध वेशभुषा केल्या.
- स्वयंसेवकांनी शेततळे व बंधारा निर्मितीचे काम पूर्ण करुन त्याची सजावट केली व ग्राम स्वच्छता केली.
- दुपारी शिबीर समारोप कार्यक्रम
    - अध्यक्ष : मा.श्री. आर. बी. बिजवे (उपाध्यक्ष,भारतीय विद्यामंदिर,अम.)
    - प्रमुख अतिथी : मा.डॉ. सतिश कुळकर्णी (कोषाध्यक्ष,भारतीय विद्यामंदिर,अम.)
    - प्रमुख उपस्थिती : मा.डॉ.ए.जे. गादेवार (प्राचार्य, भारतीय महाविद्यालय, अम.)
      प्रा.डि. एन. यादगीरे

समारोपीय समारंभापुर्वी प्रमुख पाहूण्यांनी विशेष शिबीराच्या कार्यपुर्तीचा आढावा घेतला. शेततळे व बंधारा निर्मितीचे काम पूर्णत्वास पाहून समाधान व्यक्त केले. ग्रामस्थांना प्रोत्साहीत करुन उपक्रम राबविले. या सर्व उपक्रमामध्ये गावकरी मंडळीचा उस्फुर्त सहभाग लाभला. सर्व स्पर्धेचे बक्षिस वितरीत करण्यात आले.

प्रा. निलेश कडू
कार्यक्रम अधिकारी

प्रा. आम्रपाली वासनिक
महिला कार्यक्रम अधिकारी

प्रा. पंडीत काळे
सहकार्यक्रम अधिकारी

प्रा. गायत्री चवाळे
सहमहिला कार्यक्रम अधिकारी